मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.6/19/2020-21 अन्वये प्रभाग क्र.28 मधील रहाटणी व इतर परिसरात जलनि:सारण नलिका टाकणे व सुधारणा कामे करणेकामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.70,29,676/- (अक्षरी र.रु.सत्तर लाख एकोणतीस हजार सहाशे शहात्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.70,29,676/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.70,29,676/- पेक्षा 32.99% कमी म्हणजेच र.रु.47,10,586/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.35,294/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.47,45,880/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा

अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३० विषय क्रमांक – ३०

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा. राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/१३०८/२०२०, दि.१२/११/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, राज्य शासन व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने अण्णासाहेब मगर स्टेडीयम नेहरूनगर येथे 800 खाटांचे विशेष कोवीड हॉस्पीटल दि.1/9/2020 पासून रूग्णसेवेसाठी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील दि.20/8/2020 चे आदेशानुसार सदर हॉस्पीटलसाठी दैनंदिन येणारा आवर्ती खर्च (ALL CONSUMTION PPE KIT, वीज व पाणी बील, OXYGEN, औषधे, रूग्णांचे खानपान इ. खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत करावयाचा आहे. वरील कोवीड हॉस्पीटलसाठी रूग्णाचे जेवण व नाष्ट्याचे बील PMRDA यांनी JESS आयडिया प्रा.लि. यांना अदा करणेबाबत कळविले आहे. JESS आयडिय़ा प्रा.लि.यांनी सदर व्यवस्थेपोटी मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा.लि. यांची नियुक्ती केली असून रूग्णांचे जेवण व नाष्ट्याचे बील मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा.लि. यांना अदा करणेबाबत कळविले आहे. मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा.लि. यांनी दि.01/10/ 2020 ते दि.31/10/2020 या कालावधीतील अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथिल कोवीड हॉस्पीटलमध्ये उपचार घेतलेल्या रूग्णांचे भोजन व्यवस्थेचे बील र.रू.12,52,810/- सादर केले आहे. मे.ठक्कर स्टारडम इव्हेन्ट प्रा.लि. यांनी रूग्ण जेवणापोटी सादर केलेले बील र.रू.12,52,810/- पैकी मनपाने इतर पुरवठाधारकांशी ठरविलेल्या दरानुसार सदर बील प्रति रूग्ण र.रू.180/- या प्रमाणे र.रू.12,52,800/- (अक्षरी र.रू.बारा लाख बावन्न हजार आठशे फक्त) इतकी बील देय रक्कम होत असून सदर रक्कम अदा करणेस व येणारे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) (क) व अनुसुची ड प्रकरण क्रमांक 5 (2) (2) नुसार कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/१/कावि/१८/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासनाने “कोरोना” विषाणु कोविड १९ प्रादुर्भाव रोखणेसाठी

राज्यात साथरोग प्रितबंधात्मक कायदा १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागु करुन राष्ट्रीय आपत्ती घोषिक करुन "कोरोना" विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी युध्द पातळीवर कामकाज करणेत येत आहे. महाराष्ट्र राज्यशासनाने हॉटेल्स व रेस्टॉरंट बार चालु करणे संदर्भात निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा. अति. आयुक्त (२) पि.चि.मनपा. यांनी दिलेल्या सुचनेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील चालु करणेत आलेले हॉटेल्स व रेस्टॉरंट बारमध्ये राज्य शासनाने तयार केलेल्या नियमावलीची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही या करीता पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रत्येक प्रभागात एक तपासणी पथक असे एकुण आठ प्रभागांमधील हॉटेल्स व रेस्टॉरंट बार तपासणी करणेकामी आठ पथक तयार करणेत आलेले आहे. तसेच आठ प्रभागातील आठ पथकासाठी आरोग्य मुख्यालयाकडुन दि.१५/१०/२०२० चे पत्रान्वये आठ इनोव्हा वाहने उपलब्ध करुन देणेबाबत कळविले होते. त्यानुसार इकडील विभागाकडुन दि.२८/१०/२०२० पासुन हॉटेल, बार, रेस्टॉरंट व्यावसायिकावर दंडात्मक कारवाई पथकाकरीता ०८ इनोव्हा वाहने मे. सॅम इंटरप्रायजेस व मे.बालाजी गॅरेज या दोन एजन्सीधारकांनी प्रत्येकी ०४ इनोव्हा वाहने हि उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड यांचेकडील मंजुर दराप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली आहेत. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील रुग्णवाहीका यांचे भाडे दर - परिचलन पध्दतीनुसार पुणे, पिंपरी चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्र.४८, दि.१७/०५/२०२० चे अन्वये मंजूर दर खालील प्रमाणे –

अ.क्र	पुरवठादार / कालावधी	वाहन प्रकार	वाहन संख्या	प्रति दिन मंजूर दर इंधनासहीत	आतापर्यंत झालेला खर्च
१	मे.सॅम इंटरप्रायझेस (दि.२९/१०/२०२० ते दि.१५/१२/२०२०)	इनोव्हा	०४ नग	४७१०/-	९,४९,५३६/-

उपरोक्त पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील हॉटेल्स व रेस्टॉरंट बारमध्ये राज्य शासनाने तयार केलेल्या नियमावलीची अंमलबजावणी होते किंवा नाही याकरीता पिंपरी चिंचवड मनपाच्या अ, ब, फ आणि ग या चार प्रभागांसाठी तपासणी पथकारीता ०४ इनोव्हा वाहने मे.सॅम इंटरप्रायझेस या एजन्सीन कडुन उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सदर कामी मे.सॅम इंटरप्रायझेस यांनी वाहन वापराबाबत संबंधित प्रभागातुन लॉगशिट प्रमाणित करुन वाहन वापरानुसार दि.२९/१०/२०२० ते दि.१५/१२/२०२० या कालावधीतील इनोव्हा भाडे दराचे र.रु.९,४९,५३६/- (दैनदिन भाडे) इतका खर्च आलेला असुन एकुण र.रु.९,४९,५३६/- (अक्षरी र.रु.नऊ लाख एकोणपन्नास हजार पाचशे छत्तीस फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च भांडार विभागाकडील कोरोना निधी (COVID FUND) लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/१/कावि/१९/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने विषाणूचा प्रादुर्भाव कमी करणेकरीता वैद्यकीय अधिकारी यांच्या क्षेत्रिय कार्यालय निहाय फिल्ड सर्व्हिलन्स् टिम तयार करण्यात कर्ण्यात आलेल्या असून या टीमकरीता लागणारी आवश्यक सुमो तत्सम प्रकाराची वाहने उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) मार्फत वाहने मे.प्रज्ञेश एंटरप्राजेस यांच्याकडून आवश्यकते प्रमाणे लागणारी वाहने फिल्ड सर्व्हिलन्स टिमकरीता दि.२२/०७/२०२० पासून ६ वाहने भाडेतत्वावर पुरविण्यात आलेली असुन त्यांचे बिल या विभागाकडे उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) कडील मंजुर दराप्रमाणे अदा करणेबाबत कळविले आहे व दि.१६/०९/२०२० पासून मे.शिवसमर्थ ट्रॅव्हल्स भोसरी यांचेकडील १७ वाहने कमी करून सदरची वाहने मे.प्रज्ञेश एंटरप्रायझेस यांनी पुरविलेली आहे व दि.०९/१२/२०२० पासून आणखीन १२ वाहने पुरविली आहेत. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे दि.११/०३/२०१९ चा निर्णय– परिचलन पध्दतीनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक दि.११/०३/२०१९ नुसार दर खालील प्रमाणे–

अ.क्र.	पुरवठादार व कालावधी	वाहन प्रकार	प्रतिदिन मंजुर दर + इंधन
१.	मे.प्रज्ञेश एंटरप्रायजेस	तवेरा/तत्सम	२२००/- + इंधन
२.	मे.प्रज्ञेश एंटरप्रायजेस	झायलो,ईर्टीगा,इनोव्हा,स्कॉपिओ/तत्सम वाहने	२६००/- + इंधन

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड मनपा दवाखान्याकरीता आणि क्षेत्रिय कार्यालयाकरीता/आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाकरिता आवश्यक असलेली वाहने उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) मार्फत पुरविण्यात आलेल्या मे.प्रज्ञेश एंटरप्रायझेस यांचेकडून उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) कडील शासकीय मंजूर दराने २२/०७/२०२० पासून दि.१५/०९/२०२० पर्यंत थेट पद्धतीने भाडेतत्वावर पुरविण्यात आलेल्या वाहनांचा प्रत्यक्ष खर्चास र.रू.७,८२,९०१/- ला मा.स्थायी समितीची मान्यता घेणेत आलेली आहे. तसेच दि.१६/०९/२०२० ते दि.१५/११/२०२० या कालावधीची र.रु.३५,२२,८७२/-, दि.१६/११/२०२० ते दि.३०/११/२०२० या कालावधीत अंदाजे र.रु.१०,००,०००/- व सध्या कार्यरत असलेल्या २४ वाहनांसाठी दि.०१/१२/२०२० पासून पुढील तीन महिन्या करिता अंदाजे र.रु.६०,००,०००/- अशी एकूण र.रु.१,०५,२२,८७२/- (अक्षरी र.रु एक कोटी पाच लाख बावीस हजार आठशे बहात्तर फक्त)चे खर्चास तसेच सदरचा खर्च वैद्यकीय विभागाकडील खाजगी वाहन भाड्याने घेणे या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/१/कावि/२०/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणू (कोविड -१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने विषाणूचा प्रादुर्भाव कमी करणेकरीता वैद्यकीय अधिकारी यांच्या क्षेत्रिय कार्यालय निहाय फिल्ड सर्व्हिलन्स् टिम तयार करण्यात आलेल्या असून या टीमकरीता लागणारी आवश्यक सुमो तत्सम प्रकाराची वाहने उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) मार्फत मे. श्री.शिवसमर्थ ट्रॅव्हल्स भोसरी यांच्याकडून आवश्यकतेप्रमाणे लागणारी वाहने फिल्ड सर्व्हिलन्स टिमकरीता दि.२०.०३.२०२० पासून ६४ वाहने भाडे तत्वावर पुरविण्यात आलेली असुन त्यांचे बिल या विभागाकडे उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) कडील मंजुर दराप्रमाणे अदा करणेबाबत कळविले आहे. व दि.१६/०५/२०१९ पासून १७ वाहने व दि.०९/१२/२०२० पासून १२ वाहने बंद करणेत आलेली आहेत व सद्यस्थितीत १२ वाहने कार्यरत आहेत. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे दि.११/०३/२०१९ चा निर्णय – परिचलन पध्दतीनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक दि.११/०३/२०१९ नुसार दर खालील प्रमाणे –

अ.क्र.	पुरवठादार व कालावधी	वाहन प्रकार	प्रतिदिन मंजुर दर + इंधन
१.	मे. श्री शिवसमर्थ ट्रॅव्हल्स, भोसरी	तवेरा/तत्सम	२२००/- + इंधन
२.	मे. श्री शिवसमर्थ ट्रॅव्हल्स, भोसरी	झायलो,ईर्टीगा,इनोव्हा,स्कॉपिओ/तत्सम वाहने	२६००/- + इंधन

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना या संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड मनपा दवाखान्या करीता आणि क्षेत्रिय कार्यालयाकरीता /आपत्तीव्यवस्थापन कार्यालयाकरिता आवश्यक असलेली वाहने उपप्रादेशिक कार्यालया मार्फत ६४ वाहने पुरविण्यात आलेल्या मे.शिव समर्थ ट्रॅव्हल्स भोसरी यांचेकडून उपप्रादेशिक कार्यालय, पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) कडील शासकीय मंजूर दराने दि.२०.०३.२०२० पासून दि.१५/०९/२०२० पर्यंत थेट पद्धतीने भाडेतत्वावर पुरविण्यात आलेल्या वाहनांचा प्रत्यक्ष खर्चास र.रू.१,७१,५६,४२७/- मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणेत आलेली आहे. तसेच दि.१६/०९/२०२० ते दि.१५/१०/२०२० या कालावधीची र.रु.३३,१६,९९५/- तसेच दि.१६/१०/२०२० ते दि.३०/११/२०२० या कालावधीतील अंदाजे र.रु.५०,००,०००/- व सध्या कार्यरत असलेल्या १२ वाहनांसाठी दि.०१/१२/२०२० पासून पुढील तीन महिन्या करिता अंदाजे र.रु.३०,००,०००/- अशी एकूण र.रु.१,१३,१६,९९५/- (अक्षरी र.रु एक कोटी तेरा लाख सोळा हजार नऊशे पंच्याण्णव फक्त) चे खर्चास

तसेच सदरचा खर्च वैद्यकीय विभागाकडील खाजगी वाहन भाड्याने घेणे या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/९/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.12/03/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२ चिखली परिसरात राडारोडा उचलणेसाठी यंत्रणा पुरविणेकामी मे.ओंकार विश्वास कौटकर नि.र.रू.1,21,15,338/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकवीस लाख पंधरा हजार तीनशे अडतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,21,15,338/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,21,15,338/- पेक्षा 42.00% कमी म्हणजेच र.रु.70,26,896/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.70,26,896/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३५ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/१२/२०२०, दि.११/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील Ventillator करिता Flow Sensor व O2 Cell खरेदी करणेकामी मागील मंजुर दराने व संबंधित उत्पादित कंपनीचे AMC धारक व अधिकृत वितरक मे.श्री कन्स्ट्रक्शन, निगडी यांनी सादर केलेले दरपत्रकातील दरानसार एकूण र.रु.१३,३२,०००/- + GST चे दरपत्रक व मागील मंजुर दर असल्याने स्विकृत करणेत आले आहे. बायोमेडिकल इंजिनिअर यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार असे दिसुन येत आहे की सदर पार्टस १ वर्ष कालावधीत दोनदा आवश्यक असतात. त्यानुसार सदर खरेदी १ वर्ष ग्राह्य धरुन पहिल्या पुरवठा २० नग व दुसऱ्या पुरवठा आवश्यकते नुसार २० नग असे एकुण ४० नग आवश्यकते नुसार पुरवठा करणेकामी Ventillator संबंधित उत्पादित कंपनीचे AMC धारक व अधिकृत वितरक मे.श्री कन्स्ट्रक्शन, निगडी यांच्याकडुन

महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.भाखंस-२०१४/ प्र.क्रं.८२/ भाग-III/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण ३.२.५ अन्वये ३.२.६. (क) नुसार दरकरारावर व एकल स्त्रोत पध्दतीने खरेदी करण्यास मा.अधिष्ठता यांची शिफारसीनुसार यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील Ventillator करिता Flow Sensor व O2 Cell खरेदी करणेकामी संबंधित उत्पादित कंपनीचे AMC धारक व अधिकृत वितरक मेंश्री कन्स्ट्रक्शन, निगडी यांचेकडून मागील मंजुर दर एकूण र.रु.१३,३२,०००/- + (GST) नुसार निविदा न मागवता, करारनामा करुन मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) नुसार थेट पध्दतीने करण्यास व सदर खरेदी करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.१३,३२,०००/- + (GST)ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३६ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/३९/२०२०, दि.११/०१/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.41/11/2020-2021 अन्वये प्रभाग क्र.12 सहयोगनगर अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे व दुरूस्त करणेकामी मे.भालेराव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.83,00,439/- (अक्षरी र.रु.त्र्याऐंशी लाख चारशे एकोणचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.82,83,839/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.82,83,839/- पेक्षा 41.85% कमी म्हणजेच र.रु.48,17,052/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.763/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,600/- = एकुण र.रु.48,34,415/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राटकालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३७ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२३/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/26/54/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२१ पिंपरी वाघेरे व इतर परिसरात रस्त्यांची दुरूस्ती एम.पी.एम.पध्दतीने करणेकामी देव कन्स्ट्रक्शन

नि.र.रू.30,87,417/- (अक्षरी र.रु.तीस लाख सत्याऐंशी हजार चारशे सतरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.30,20,067/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.30,20,067/- पेक्षा 35.77% कमी म्हणजेच र.रु.19,39,789/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.18,516/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.67,350/- = एकुण र.रु.20,25,655/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३८ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२४/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/26/55/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२१ पिंपरी वाघिरे व इतर परिसरात रस्त्यांची दुरूस्ती बी.एम. व बी.सी.पध्दतीने करणेकामी देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.31,14,670/- (अक्षरी र.रू.एकतीस लाख चौदा हजार सहाशे सत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.30,53,670/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.30,53,670/- पेक्षा 34.77% कमी म्हणजेच र.रु.19,91,909/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,827/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.61,000/- = एकुण र.रु.20,55,736/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणेबंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१३९ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/४/कावि/५२/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.28/2020-2021 अन्वये फ क्षेत्रीय कार्यालय

अंतर्गत चिखली मोरेवस्ती प्रभाग क्र.1 अंतर्गत संतपीठ येथे आवश्यक विद्युत विषयक कामे करणेकामी मे.रियल इलेक्ट्रीकल्स निविदा र.रु.3,99,68824/- (अक्षरी र.रु.तीन कोटी नव्व्याण्णव लाख अडुसष्ट हजार आठशे चोवीस फक्त) पेक्षा –3.00% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४० विषय क्रमांक – ४०

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/२८/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/26/51/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२४ मधील गणेशनगर, लक्ष्मणनगर, गुजरनगर, दत्तनगर व इतर परिसरात रस्त्यांची दुरुस्ती बी.एम. व बी.सी. पध्दतीने करणेकामी मे.श्री गणेश कन्स्ट्रक्शन नि.र.रू.37,40,012/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख चाळीस हजार बारा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,65,662/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,65,662/- पेक्षा 32.7% कमी म्हणजेच र.रु.24,66,991/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,968/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.74,350/- = एकुण र.रु.25,44,309/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४१ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/२९/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/26/53/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२४ मधील पडवळनगर, आनंदपार्क, दत्तनगर व इतर परिसरात रस्त्यांची दुरुस्ती एम.पी.एम.पध्दतीने करणेकामी मे.ए.एफ.मंजाळकर नि.र.रू.36,86,278/- (अक्षरी र.रु.छत्तीस लाख शहाऐंशी हजार दोनशे अठ्ठयाहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.36,18,928/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.36,18,928/- पेक्षा 35.1% कमी

म्हणजेच र.रु.23,48,684/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.44,098/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.67,350/- = एकुण र.रु.24,60,132/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४२ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/३४/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- "ब" क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.16 मधील किवळे, मामुर्डी व लगतच्या परिसरामध्ये वार्षिक ठेकेदारी पद्धतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची देखभाल दुरुस्तीकरणे.

विषय क्रमांक ४२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४३ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/३५/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- "ब" क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.16 मधील रावेत व लगतच्या परिसरामध्ये वार्षिक ठेकेदारी पद्धतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती करणे.

विषय क्रमांक ४३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/३७/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- अजंठानगर ते घरकुल परिसरातील जलनि:सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे.

विषय क्रमांक ४४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४५ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य BRTS

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ BRTS/४०/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड मनपा परिसरातील बीआरटीएस मार्गावर ट्राफिक वार्डन करीता एफआरपी कॅनोपी बसविणे.

विषय क्रमांक ४५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४६ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – पशुवैद्यकिय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/२/कावि/३३२/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पशुवैदयकीय विभागाचे अंतर्गत ई-निविदा क्र.०९/२०२०-२०२१ अन्वये श्वान संतती नियमन शस्त्रक्रिया कामकाजाकरीता एकुण चार संस्थाची नेमणुक करण्यात आलेली आहे. याकामी श्वान संतती नियमन शस्त्रक्रिया या लेखाशिर्षावर सन २०२०-२०२१ मध्ये र.रु.२,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली होती. पैकी माहे ऑक्टोबर २०२१ पर्यत र.रु.१,९३,३९,६४१/- इतकी रकम खर्ची पडली असुन र.रु.६,६०,३५९/- इतकी रकम शिलक आहे. उक्त संस्थाचे मुदत १५ जानेवारी २०२१ रोजी संपत असल्याने या कामकाजाकरीता नव्याने ई-निविदा क्र.०२/२०२०-२१ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत कार्यरत चार संस्थाची देयके माहे नोव्हेंबर २०२० ते जानेवारी २०२१ पर्यंत अदा करणे आवश्यक आहे. या करीता नमुद लेखाशिर्षावर पुरेशी रकम शिलक नसल्याने “चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च” या लेखाशिर्षावर उपल्बध असलेल्या र.रु.३,००,००,०००/- या रकमेतुन र.रु.१,५०,००,०००/- वर्ग करणे प्रस्तावित आहे. मौजे चिखली गट क्र.१६५५/२ पै. आ.क्र.१/७९ क्षेत्र २०००० चौ.मी. ही जागा गुरांचा गोठा या प्रयोजनाकरीता आरक्षित असुन सदर जागेचा ताबा भुमी आणि जिंदगी विभागाव्दारा दि.०४/११/२०१९ रोजी पशु वैद्यकीय विभागाकडे देण्यात आला आहे. म.न.पा.व्दारे निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार नोंदणीकृत पात्र संस्थेस चालविण्यास देण्यात येणार आहे. या ठिकाणी गोठा स्थापित करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत नियोजित जागेत स्थापत्य विषयक व तत्सम सुविधा उपलब्ध होणेस विलंब अपेक्षित आहे. यास्तव सदर तरतुद वर्ग करणे शक्य आहे. त्यानुषंगाने उक्त नमुद कालावधीकरीता एकुण चार संस्थांना कामकाजाची देयके अदा करणे आवश्यक आहे. सबब, पशु वैदयकीय विभागाकडील चालू आर्थिक वर्षातील “चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च” या लेखाशिर्षावरील उपलब्ध

असलेल्या तरतुदी मधील (र.रु.३,००,००,०००/- पैकी) र.रु.१,५०,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी पन्नास लाख फक्त) श्वान संतती नियमन शस्त्रक्रिया या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४७ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – पशुवैद्यकिय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/२/कावि/३३१/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- श्वान संतती नियमन शस्त्रक्रिया कामकाजाकरिता मुदतवाढ मिळणेबाबत.

विषय क्रमांक ४७ चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४८ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – जलशुध्दीकरणे केंद्र से.२३

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. शितल शिंदे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जशुके/वि/४/१३८/२०२०, दि.१५/१२/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या पाणीपुरवठा व वितरण व्यवस्थेअंतर्गत पुनावळे येथील पंपगृहास म.रा.वि.वि. कं.कडून २२ केव्ही. क्षमतेचा उच्चदाब वीजपुरवठा करणेत येतो. सदर उच्चदाब वीजपुरवठ्याचे मिटरिंग किऑक्स दि.२२.११.२०२० रोजी नादुरूस्त झालेला आहे. सबब सदर २२ केव्ही उच्चदाब मिटरिंग किऑक्स तातडीने बदलून नविन बसविणे आवश्यक आहे. सदर काम म.न.पा. कडील चालू असलेल्या देखभाल दुरूस्तीच्या कामामधून करणे शक्य आहे. सदरचे काम म.रा.वि.वि.कं. शी संबंधित असून त्याकरीता म.रा.वि.वि. कं. ने त्यांचेकडील दि.११.१२.२०२० च्या चलनाद्वारे र.रू.२१,२४०/- इतके चाचणी शुल्क अदा करणेबाबत कळविले आहे. उपरोक्त नमूद चाचणी शुल्क र.रू.२१,२४०/- (अक्षरी र.रू. एकवीस हजार दोनशे चाळीस फक्त) म.रा.वि.वि. कं. स तातडीने भरणा करणे आवश्यक असून सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१४९ विषय क्रमांक – ४९

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय, प्रशासन

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.हक्षेका/सावा/प्रशा/कावि/२०२१, दि.११/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सार्वजनिक वाचनालय हे सोहम लायब्ररी यांना करारनामा करून र.रू.१०,०००/- मानधनवर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५० विषय क्रमांक – ५०

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/तां-४/४१/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य मुख्यालयामार्फत पिपंरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणारे इमारत बांधकाम, लँडस्केपींग, इंटरिअर डिझायनिंग व इतर विकास प्रकल्पाच्या कामा करिता नि.नो.क्र.२४/१/२०१७-१८ अन्वये Expression of Interest ची निविदा प्रसिध्द करणेत आली होती, त्यास अनुसरुन टप्पा-१ मध्ये एकूण ३७ व टप्पा-२ मध्ये एकूण १० इच्छुक सल्लागारांना सहभागी करुन घेणेत आलेले आहे. टप्पा-३ मध्ये वास्तुविशारद मे.सृजन रिसर्च अन्ड प्लॅनिंग पॅनेल फांऊन्डेशन यांचे कामाचे वर्गवारी प्रमाणे प्रपत्र-अ (इमारत बांधकाम विषयक कामे) श्रेणी III व प्रपत्र-ब (लँडस्केपींग विषयक कामे) श्रेणी III व प्रपत्र-क (इंटेरिअर डिझायनिंग विषयक कामे) श्रेणी III याप्रमाणे प्रपत्र-अ, ब व क तयार करणेत आले आहे. टप्पा-३ मधील प्रपत्र-अ, ब व क प्रमाणे एकूण ०१ वास्तुविशारद मे.सृजन रिसर्च अन्ड प्लॅनिंग पॅनेल फांऊन्डेशन यांना पॅनेलवर घेणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/२३/२०२०, दि.१४/०१/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधतात्मक उपाय योजना करणेकामी भविष्यात केल्या जाणा-या कोवीड केअर सेंटर तसेच Institonal Quarantine केलेल्या व्यक्ती व रुग्णासाठी आवश्यक साहित्य Mattress – (कॉटन गादी) खरेदीकामी अल्प मुदतीची जाहिर सूचना क्रं 05/2020-21 अन्वये दर पत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार मे.समर्थ मेडीकल अँन्ड जनरल स्टोअर, चिंचवड यांचे Mattress – (कॉटन गादी) करिता प्रति नग 455.25 प्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. तथापि मा.आयुक्त. सो यांनी सदर साहित्याचा तातडीने पुरवठा करणेकामी L1 च्या दराने L1 ते L5 या पुरवठाधारकांना प्रति 300 नग पुरवठा करणेस तयार असलेने दि.8/08/2020

रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये त्यातील पाचही पुरवठाधारकांना आदेश देणेस मंजुरी देणेत आलेली आहे. त्यानुसार मे.किरण फॅब्रीक्स, इचलकंरजी यांना एकुण र.रु.1,36,575/- मध्ये Mattress – (कॉटन गादी) 300 नग खरेदी करणेकामीचे चे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/६०४/२०२१, दि.१४/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.32/11/2020-21 अन्वये सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१८ मधील रुग्णालयांची दुरुस्ती करणेकामी मे.केसीआर कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.28,99,617/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख नव्याण्णव हजार सहाशे सतरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.28,69,617/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.28,69,617/- पेक्षा 24.99% कमी म्हणजेच र.रु.21,52,500/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.9,308/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.30,000/- = एकुण र.रु.21,91,808/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५३ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/२४/२०२१, दि.१४/०१/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधतात्मक उपाय योजना करणेकामी भविष्यात केल्या जाणा-या कोवीड केअर सेंटर तसेच Institonal Quarantine केलेल्या व्यक्ती व रुग्णासाठी आवश्यक साहित्य Mattress – (कॉटन गादी) खरेदीकामी अल्प मुदतीची जाहिर सूचना क्रं 05/2020-21 अन्वये दर पत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार मे.समर्थ मेडीकल अँन्ड जनरल स्टोअर,चिंचवड यांचे Mattress – (कॉटन गादी) करिता प्रति नग 455.25 प्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. तथापि मा.आयुक्त. सो यांनी सदर साहित्याचा तातडीने पुरवठा करणेकामी L1 च्या दराने L1 ते L5 या पुरवठाधारकांना प्रति 300 नग पुरवठा करणेस तयार असलेने दि.8/08/2020

रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये त्यातील पाचही पुरवठाधारकांना आदेश देणेस मंजुरी देणेत आलेली आहे. त्यानुसार मे.अर्थव कन्स्ट्रक्शन, पुणे यांना एकुण र.रु.1,36,575/- मध्ये Mattress – (कॉटन गादी) 300 नग खरेदी करणेकामीचे खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५४ विषय क्रमांक – ५४

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – YCMH PGI स्टे.भांडार

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वासीएमएच/०५/कावि/६/२०२१, दि.१४/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएमएच–पीजीआय, येथील मध्यवर्ती निर्जंतुकीकरण केंद्र (CSSD) उपयुक्त व आवश्यक उपकरणांसह अद्ययावत करणेकामी मा.वैद्यकीस तज्ञ सल्लागार समिती यांची दि.२३/१२/२०२० रोजी मिटींग झाली.सदर मिटींगमध्ये वायसीएमएच-पीजीआय येथील CSSD विभाग आवश्यक व अद्ययावत उपकरणांसह(with turn key project) अद्ययावत करणेकामी चर्चा झाली. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.7148, दि.3/6/2020 अन्वये कोरोना(Covid-19) या संसर्गजन्य रोगावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी वैद्यकीय व आरोग्य उपकरणे खरेदीकामी श्री.मनोजकुमार खेमचंद पाटील यांची हेल्थ केअर सल्लागर म्हणून नेमणूक करणेस व नियमानुसार त्यांची फी अदा करणेस यापूर्वी मान्यता दिलेली असल्याने व त्यानुसार त्यांचेकडून वैद्यकीय विभागाकडील उपकरणे खरेदीकामी स्पेसिफिकेशन व कामाचे अंदाजपत्रक याबाबत अभिप्राय घेवून खरेदी कार्यवाही केली जात आहे. मा.वैद्यकीय तज्ञ सल्लागार समितीनेही वायसीएमएच-पीजीआय येथील मध्यवर्ती निर्जंतुकीकरण केंद्र (CSSD) आवश्यक उपकरणांसह अद्ययावत व नुतनीकरण करणेकामी श्री.मनोजकुमार खेमचंद पाटील यांची हेल्थ सल्लागार म्हणून नेमणूक करणेकामी सुचविले आहे. सबब मा.स्थायी समिती सभा ठरावाचा विचार करता सदर हेल्थ केअर सल्लागार यांची नेमणूक फक्त कोरोना संसर्गा वरील प्रतिबंधक उपाय योजना याकरीता होती. परंतू वायसीएमएच-पीजीआय येथेCSSD विभाग अद्ययावत करणेकामी त्याच बरोबर महानगरपालिकेचे सर्व रुग्णालयांसाठी पुढील एक वर्षासाठी उपकरणे व अन्य वस्तू व सेवा इ. खरेदी, रूग्णालये अद्ययावत करणेकामी" श्री.मनोजकुमार पाटील यांची हेल्थ केअर सल्लागार म्हणून नेमणूक करुन यांचेबरोबर करारनामा करून घेणेस व त्यांची शासन नियमानुसार फी अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि प्रकरण ५(२) (२) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५५ विषय क्रमांक – ५५

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय, पाणीपुरवठा

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.फक्षेका/पापु/५/कावि/१८/२०२१, दि.१४/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२)यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७१९२, दि.२४/६/२०२० अन्वयेचे ठरावानुसार मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१५/०१/२०१९-२० सन २०१९-२० करिता फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कृष्णानगर व इतर ठिकाणी वाल्व्ह ऑपरेशन व्यवस्थापन करणेकरिता मजूर पुरविणेकामी (२०१९-२०) या कामासाठी निविदा र.रु.७४,९७,७४८/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख सत्याण्णव हजार सातशे अठ्ठेचाळीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरियल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून निविदा र.रु.७४,९७,७४८/- वर दर मागविणेत आलेले आहेत. त्यानुसार सदर काम मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित या ठेकेदाराकडून निविदा र.रु.७४,९७,७४८/- पेक्षा सुधारित दर ०.९४% कमी दराची म्हणजेच र.रु.७४,२७,२६९/- रॉयल्टीची रक्कम रु.०/- मटेरियल टेस्टिंग चार्जेस रक्कम रु.०/- एकूण र.रु.७४,२७,२६९/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतनदर यांचे नुसार वाढ/घट अदा करणेस व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तू व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे आवश्यक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करणेत आलेला आहे. त्यानुसारया कामाचा आदेश ठेकेदार “मे.राजलक्ष्मी स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.” यांना दिनांक १४/०८/२०२० रोजी देणेत आला आहे. सदर कामाची मुदत १२महिने म्हणजेच दिनांक १३/०८/२०२१ पर्यंत आहे. सदर कामातचिखली,जाधववाडी, कुदळवाडी, कृष्णानगर, मोरेवस्ती, चिखली गावठाण, रुपीनगर, तळवडे गावठाण,त्रिवेणीनगर, शरदनगर, सुदर्शननगर, नेवाळेवस्ती, पाटीलनगर, निगडी, यमुनानगर, से.२२ ओटास्कीम, इ. परिसरामध्ये पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व्ह ऑपरेशनसाठी मजुर कर्मचारी पुरविणे या कामाचा समावेश आहे. सदर काम ३४% झालेले आहे. सदर निविदेच्या कामासाठी जुलै २०१९ चे दर अंदाजपत्रक करताना घेणेत आलेले आहेत. कामगार कल्याण विभागाकडील दि.११/८/२०२० चे परिपत्रकानुसार १ जुलै २०२० पासून कामगारांचे किमान वेतन दर वाढलेले आहेत. त्याप्रमाणे कामगारांना किमान वेतनानुसार १४ ऑगस्ट २०२० पासून वाढीव वेतन अदा करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सद्यस्थितीत चालू असलेल्या वर उल्लेख केलेल्या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी चालू काम सुधारित करण्याची आवश्यकता असून, सदर काम चालू ठेवण्यासाठी सुधारित खर्च र.रु. ९१,३४,११२/- इतकी येत आहे. त्यामधून मूळ खर्चाच्या मान्यतेची र.रु.७४,९७,७४८/- वजा जाता येणा-या वाढीव खर्च र.रु.१६,३६,३६४/- इतका होणार आहे. तसेच या कामासाठी येणा-या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५६ विषय क्रमांक – ५६

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/४३/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर On Street पार्कींग पॉलिसी राबविणे. (भाग -२)

विषय क्रमांक ५६ चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५७ विषय क्रमांक – ५७

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/४६/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर On Street पार्कींग पॉलिसी राबविणे. (भाग - ५)

विषय क्रमांक ५७ चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५८ विषय क्रमांक – ५८

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/४४/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर On Street पार्कींग पॉलिसी राबविणे. (भाग - ३)

विषय क्रमांक ५८ चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१५९ विषय क्रमांक – ५९

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/४५/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर On Street पार्कींग पॉलिसी राबविणे. (भाग - ४)

विषय क्रमांक ५९ चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१६० विषय क्रमांक – ६०

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/४७/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर On Street पार्कींग पॉलिसी राबविणे. (भाग - ६)

विषय क्रमांक ६० चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१६१ विषय क्रमांक – ६१

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/४२/२०२१, दि.१३/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषयः- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांवर On Street पार्कींग पॉलिसी राबविणे. (भाग - १)

विषय क्रमांक ६१ चा विचार दिनांक ०३/०२/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१६२ विषय क्रमांक – ६२

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता(वि) यांचे पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/७/२०२१, दि.१२/०१/२०२१

मा.कार्यकारी अभियंता(वि) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत सांगवी येथे वॉर्ड क्र.३१ मध्ये चैत्रबन सोसायटी येथे मनपाचा स्ट्रिट लाईट फिडर आहे. सदर फिडरवर जास्त विद्युत भार आहे व अर्धे सर्किट रोड क्रॉस आहे. रोड क्रॉस सर्किट असल्याने रोड खोदाईमध्ये वारंवार केबल तोडल्या जात आहेत, त्यामुळे वारंवार तांत्रिक बिघाड होत आहे व भविष्यात जुन्या फिडरवर अधिकचा विद्युत भार जोडावयाचा

असल्याने सध्याचा मिटर जळण्याची शक्यता आहे. त्यामुळे रोड पलीकडील टण्णू शाळेजवळ पथदिव्यांसाठी नविन ३ फेज विजमीटर घेणे आवश्यक आहे. सदर मिटरसाठी MSEDCL यांचेकडे विहित नमुन्यात नविन विजजोड मागणी अर्ज सादर केला असता, म.रा.वि.वि.कं.लि.कडील कोटेशन क्र.16598974 दि.०२.०१.२०२१ नुसार र.रु.५३०६/- चे कोटेशन प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदरचे नविन वीजमिटर शुल्क मराविवि कं लि.यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८१६३ विषय क्रमांक – ६३

दिनांक – १९/०१/२०२१ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्यालय/१५/२०२१, दि.१४/०१/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

